# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- ११६-२२** **दिनांक :- २६/०४/२०२२**

## रमजान सणादरम्यान अति रहदारीच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणे हद्दीमधील रमजान सणानिमीत्त निहाल कॉर्नर, नरेंद्र पार्क, लोढा रोड, निलम पार्क, एन.एच. स्कूल सर्कल, गीता नगर फेज-३, हैदरी चौक या परिसरात खरेदी-विक्रीसाठी येणारे मुस्लीम बांधव व इतर नागरिकांच्या वाढलेल्या वर्दळीमुळे होणारे संभाव्य अपघात व वाहतूक कोंडी टाळण्यासाठी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी वाहतूक नियोजन करण्याकरिता अधिसूचना जारी करुन पुढिलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

दिनांक- २८/०४/२०२२ ते दि. ०३/०५/२०२२ पर्यंत दररोज १६.०० वाजता ते २४.०० वाजेपर्यंत नयानगर पोलीस ठाणे हद्दीमधील खालील चार ठिकाणी दुचाकी व अत्यावश्यक सेवेतील वाहने (पोलीसांची व इतर शासकिय वाहने, फायर ब्रिगेडची वाहने, ॲम्बुलन्स इ.) वगळता तसेच वरील नमुद परिसरात राहणाऱ्या रहीवाशांची वाहने वगळता इतर वाहनांना प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

१. **प्रवेश बंद** :- एन.एच.स्कूल रोड चौक **ते** हैदरी चौकाच्या दिशेने जाताना.
**पर्यायी मार्ग** :- शिवारगार्डन सिग्नलमार्गे इच्छित स्थळी जाण्यास मुभा राहील.

२. **प्रवेश बंद** :- हैदरी चौक **ते** नरेंद्र पार्कच्या दिशेने जाताना
**पर्यायी मार्ग** :- नयानगर पोलीस ठाणे मार्गे व एच.पी.पेट्रोल पंप मार्गे इच्छित स्थळी जाण्यास मुभा राहील.

३. **प्रवेश बंद** :- निहाल कॉर्नर/शम्स मस्जीद चौक **ते** नरेंद्र पार्क/लोढा रोडच्या दिशेने जाताना.
**पर्यायी मार्ग** :- पुजानगर रोड (मिरादातार रोड) मार्गे व अस्मिता क्लब रोड मार्गे इच्छित स्थळी जाण्यास मुभा राहील.

४. **प्रवेश बंद** :- निलम पार्क चौक **ते** लोढा रोड/नरेंद्र पार्कच्या दिशेने जाताना.

**पर्यायी मार्ग** :- बॅक रोडने वाहनांना इच्छित स्थळी जाण्यास मुभा राहील.

प्रवेश बंद करण्यात आलेल्या ठिकाणाहून वाहने पार्किंग करुन वरील नमुद परिसरात प्रवेश करु इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी खालीलप्रमाणे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

१. एन.एच.स्कूल रोड चौक **ते** हैदरी चौकाच्या दिशेने जाणाया वाहनांसाठी -
**पार्कींग** – एन.एच. स्कूलचे ग्राऊंडमध्ये.

२. हैदरी चौक **ते** नरेंद्र पार्कच्या दिशेने जाणाया वाहनांसाठी -
**पार्कींग** - कम्युनीटी एम.बी.एम.सी.हॉल समोर.

३. निहाल कॉर्नर/शम्स मस्जीद चौक **ते** नरेंद्र पार्क/लोढा रोडच्या दिशेने जाणाया वाहनांसाठी –
**पार्कींग** - शम्स हॉल समोरील बंद रस्त्यावर.

४. निलम पार्क चौक ते लोढा रोड / नरेंद्र पार्कच्या दिशेने जाणाया वाहनांसाठी -
**पार्कींग** - निलम पार्क ते टिपूसूलतान रोडकडे जाणाया रोडवर दोन्ही बाजूस.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१)(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११६(१) (अ)(ब) अन्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणे हद्दीमधील उपरोक्त नमुद ठिकाणांकरिता दिनांक- २८/०४/२०२२ ते दि. ०३/०५/२०२२ पर्यंत दररोज १६.०० वाजता ते २४.०० वा. या कालावधीकरिता लागू केलेली आहे.

----ooo----